# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०५/ २०१४** **दिनांक १२.०४.२०१४**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०१.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दि.१२.०४.२०१४ रोजी दुपारी ०१.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-०४/ १८७/ २०१४, दिनांक ११ एप्रिल, २०१४ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दि.१२.०४.२०१४ रोजी दुपारी ०१.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.बी.यु.देबडवार, प्र.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा. श्री.बी.यु.देबडवार, प्र.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री. अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.बी.यु.देबडवार, प्र.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १५.०३.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.२६३** **दिनांक १५.०३.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०२** **दिनांक १०.०४.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.२६४** दि.१०.०४.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **<u>द्वारावती भक्तनिवास परिसरातील स्वयंसेवी प्रसादभोजन कक्षाचे (कँटीन) मुख्य प्रवेशद्वारासमोरील भागात शेड उभारणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.</u>**

**<u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:</u>** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**<u>मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:</u>** मा. त्रीसदस्य समितीचे दिनांक २६ जूलै, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५४७ अन्वये, कॅन्टीनचे समोरील भागात शेडची उभारणी करणेकामी येणारे रुपये ५,७२,३४५/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यता देण्यात आली आहे.

**<u>प्रस्तावना:-</u>** संस्थानचे व्दारावती भक्तनिवास/ साईनाथ हॉस्पीटल इमारत परिसरात असलेले स्वयंसेवी प्रसाद कॅन्टीनमध्ये साईभक्तांची व रुग्णांचे नातेवाईकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यांचे उन, वारा व पावसापासून संरक्षण होणेचे दृष्टीने सदरहू कॅन्टीनचे समोरील भागात शेडची उभारणी करणेकामी येणारे रुपये ५,७२,३४५/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मा. त्रीसदस्य समितीचे दिनांक २६ जूलै, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५४७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरहू कामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सदरचे मुदतीत श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव यांनी कोरी निविदा फॉर्म विकत घेवून सिलबंद निविदा सादर केली असल्याने, सदरहू कामी दिनांक ११ जानेवारी, २०१४ रोजीचे प्रशासकिय मान्यते अन्वये फेर निविदा सुचना प्रसिध्द करुन दिनांक ०६ फेब्रवारी, २०१४ ते दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४ अखेर कोरे निविदा व्रिकीची मुदत देऊन, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१४ रोजी सिलबंद निविदा सादर करणेची मुदत देणेत आली होती. सदरचे मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निवदा फॉर्म विकत घेऊन सादर केलेले आहेत.

०१. मंगेश आर लोढा, शिर्डी १९४९३ / १७०२.०२१४
०२. बी. पी. शिंदे, पढेगांव १९४९४ / १७.०२.२०१४
०३. निरगुडे आर.व्हि., नाशिक १९४९६ / १७.०२.२०१४

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, उपस्थित निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**(निविदेतील अंदाजपत्रकीय रक्कम रु.५,७२,३४५/-)**

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील मुळ दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मंगेश आर लोढा, शिर्डी | ५,७२,३४५/- | **५,३५,१४३/-** (निविदा रकमेत ६.५% कमी) |
| ०२ | बी. पी. शिंदे, पढेगांव | ५,४३,७२८/- (निविदा रकमेत ५% कमी) | ५,४३,७२८/- (निविदा रकमेत ५% कमी) |
| ०३ | निरगुडे आर.व्हि., नाशिक | ५,८९,३१५/- (निविदा रकमेत ३% अधिक) | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास परिसरातील स्वयंसेवी प्रसादभोजन कक्षाचे (कँटीन) मुख्य प्रवेशद्वारासमोरील भागात शेड उभारणेचे काम करुन घेणेसाठी मे.मंगेश आर लोढा, शिर्डी यांचे निविदा रकमेवर ६.५०% कमी (रु.५,३५,१४३/-) मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असलेले स्वच्छतागृहातील संडास व मुताऱ्यांची संख्या वाढविणेकामी करावयाचे बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदः** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः** मा. त्रीसदस्य समितीचे दिनांक २१ जुन, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४४१ अन्वये, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधांतर्गत स्वच्छतागृह उपलब्ध करून देणेचे काम विहित पद्धतीने कोटेशन मागवून करून घेणेस व याकामी येणाऱ्या रु.३,५०,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्तावनाः** श्री साईनाथ माध्यमिकविद्यालयातील विद्यार्थ्यांना भौतिक सुविधांतर्गत स्वच्छतागृह उपलब्ध करून देणेचे काम विहित पद्धतीने कोटेशन मागवून करून घेणेस व याकामी येणाऱ्या रु.३,५०,०००/- खर्चास मा. त्रीसदस्य समितीचे दिनांक २१ जुन, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४४१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरहू कामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सदरचे मुदतीत श्री. बी. पी. शिंदे, पढेगांव यांनी कोरे कोटेशन फॉर्म विकत घेवून सिलबंद निविदा सादर केली असल्याने, सदरहू कामी दिनांक ११ जानेवारी, २०१४ रोजीचे प्रशासकिय मान्यते अन्वये फेर निविदा सुचना प्रसिध्द करुन दि.०६ फेब्रुवारी, २०१४ ते दि.१३ फेब्रुवारी, २०१४ अखेर कोरे निविदा व्रिकीची मुदत देऊन, दिनांक १७ फेब्रुवारी, २०१४ रोजी सिलबंद निविदा सादर करणेची मुदत देणेत आली होती. सदरचे मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निवदा फॉर्म विकत घेऊन सादर केलेले आहेत.

१. श्री. गोरे अे. अे., नाशिक १९४९७ / १७०२.०२१४
२. बी. पी. शिंदे, पढेगांव १९४९६ / १७.०२.२०१४
३. निरगुडे आर. व्हि., नाशिक १९४९८ / १७.०२.२०१४

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, उपस्थित निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**(निविदेतील अंदाजपत्रकीय रक्कम रु.३,५०,०००/-)**

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील मुळ दर |
|---|---|---|
| ०१ | श्री. गोरे अे. अे., नाशिक | ३,९२,०००/- (निविदा रकमेवर १२% अधिक) |
| ०२ | बी. पी. शिंदे, पढेगांव | ३,७४,५००/- (निविदा रकमेवर ७% अधिक) |

| | | |
|---|---|---|
| ०३ | निरगुडे आर .व्हि., नाशिक | ३,८५,०००/-<br>(निविदा रकमेवर १०% अधिक) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी असलेले स्वच्छतागृहातील संडास व मुताऱ्यांची संख्या वाढविणेचे काम करुन घेणेसाठी मे. बी. पी. शिंदे, पढेगांव हे एकच निविदाधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित होते, त्यामुळे सदरहू विषयावर चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी तीनही निविदाधारकांना पुढील उपसमिती सभेपुढे बोलविणेत यावे, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०३ **श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयांकरीता बसविणेत आलेल्या सांडपाणी संयंत्र (STP) करीता वार्षीक देखभाल (O & M) करीता प्राप्त निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक:** श्री साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ रुग्णालयाचे परिसरामध्ये ठेकेदार डेक्कन एन्व्हायरोमेंटल कन्सल्टटस्, प्रा.लि;पुणे यांचे मार्फत रुग्णालयाचे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी दोन सांडपाणी प्रक्रीया संयत्र (STP) सन २००९ मध्ये उभारण्यात आलेले प्लॅन्ट कार्यान्वीत असून, सदर प्रकल्पाचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

**(अ) श्री साईबाबा हॉस्पीटल सांडपाणी संयंत्र:** सदर प्रकल्पाची उभारणी दि. ३० एप्रिल, २००९ मध्ये करणेत आली असून, त्यासाठी रुपये १८,९९,०४०/- मात्र खर्च आलेला आहे. सदर प्रकल्पाची क्षमता २०० Cum/ Day आहे.

**(ब) श्री साईनाथ रुग्णालय सांडपाणी संयंत्र**: सदर प्रकल्पाची उभारणी दि. ३० एप्रिल, २००९ मध्ये करणेत आली असून, त्यासाठी रुपये १८,०८,६२४/- मात्र खर्च आलेला आहे. सदर प्रकल्पाची क्षमता १५० Cum/ Day आहे.

उपरोक्त प्रमाणे दोन्हीं प्लॅन्टचे काम ठेकेदार मे. डेक्कन एनव्हायरोमेंट सर्व्हिसेस, पुणे या संस्थेने सन २००९ मध्ये पूर्ण केले असून, सदरचे प्रकल्प पूर्ण झालेनंतर निविदा शर्तीनुसार ठेकेदार/ संस्थेने दि.१०/०२/२०११ अखेर पर्यंत सदर दोन्ही प्लान्टचे O & M केलेले आहे. ठेकेदार यांनी सदरचे कालावधी मध्ये प्लॅन्ट व्यवस्थीत चालविला आहे. त्यानंतर सदर प्रकल्प देखभाल दुरुस्तीसाठी (O & M) साठी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये ठेकेदार मे. डेक्कन एनव्हायरोमेंट सर्व्हिसेस, पुणे यांना खालील कालावधीसाठी देणेत आलेला आहे.

| अ. नं. | वार्षीक देखभाल व दुरुस्ती कालावधी | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | दि. ०१ मार्च, २०११ ते दि. २८ फेब्रुवारी, २०१२ अखेर एक वर्षासाठी | ५,८६,९६३/- |
| ०२. | दिनांक ०१ मार्च, २०१२ ते दि.२८ फेब्रुवारी, २०१३ अखेर एक वर्षासाठी | ६,४५,६५२/- |
| ०३. | दिनांक ०१ मार्च, २०१३ ते दि. २८ फेब्रुवारी, २०१४ अखेर एक वर्षासाठी (रु. ६०,०००/- प्रती महिना) | ७,२०,०००/- |

**प्रस्तावना:** उपरोक्त प्रमाणे **"अ"** व **"ब"** चे दोन्ही प्रकल्प सद्यस्थितीत सुव्यवस्थित चालू असून, सदर प्रकल्पाव्दारे प्रक्रीया केलेले पाणी तेथील परिसरातील बागेसाठी दैनंदिन वापरात येत आहे. सदर प्रकल्पाचे O & M चा कालावधी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी संपुष्टात आला असल्याने, सदरहू प्रकल्प O & M या तत्त्वावर चालविणेकामी अशा प्रकरच्या काम करणाऱ्या ठेकेदार/ संस्थाकडून जाहिरात देऊन निविदा मागविणेस व याकामी येणारे ९,००,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत आला आहे.

तथापि, सदरहू प्रक्रीयेस काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने, माहे मार्च, २०१४ पासून सदर प्रकल्प कार्यान्वीत ठेवण्यासाठी सदर प्रकल्पावर काम करणारे कर्मचारी आउट सोर्सींगमार्फत नेमण्यात आले आहे. दरम्यानचे कालावधीत सदरहू कामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेबाबतची कार्यवाही करुन घेणेस इकडील दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४ रोजीचे प्रशासकिय मंजूरी अन्वये मान्यता घेणेत आली असून, त्यानुसार सदरहू कामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात व संस्थानचे सकेतस्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन दिनांक ०७ मार्च, २०१४ ते दिनांक १७ मार्च, २०१४ अखेर निविदा विक्रीची मुदत देऊन, सदरच्या सिलबंद निविदा दिनांक २१ मार्च, २०१४ रोजी सादर करणेची मुदत देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत खालील इच्छुक ठेकेदार/ संस्थांनी कोऱ्या निविदा घेऊन सादर केल्या आहेत.

| अ. नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव / पत्ता | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|
| ०१. | साई लॅब्रोटरीज् प्रा. लि., हैद्राबाद | २१६५५ / २१.०३.२०१४ |
| ०२. | यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीज्, पुणे | २१७२४ / २१.०३.२०१४ |
| ०३. | ३ आर वेस्ट मॅनेजमेंट, पुणे | २१७२५ / २१.०३.२०१४ |
| ०४. | साज वॉटर ट्रिट इंडीया प्रा. लि., अहमदनगर | २१७२३ / २१.०३.२०१४ |

**विभागाचा अभिप्राय/ मतः** श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सांडपाणी प्रक्रिया संयंत्र (STP) प्रकल्पाचा O & M तत्वावर पुढील १२ महिन्याचे कालावधीसाठी चालविणेकामी देणे आवश्यक असल्याने, उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या चार सिलबंद निविदा उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित कामासाठी विहीत करण्यात आलेल्या Minimum Qualifyig Criteria नुसार वरीलपैकी एकही निविदाधारक पात्र होत नाही. त्यामुळे उपरोक्त सर्व निविदा रद्द करण्यात याव्यात व सदरहूकामी पूर्व पात्रता निकष शिथील करणेत येऊन नव्याने फेर निविदा मागविण्यात याव्यात, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०४ संस्थानचे सेवाधाम इमारतीमध्ये साईभक्तांचे सुविधेसाठी टॉयलेट ब्लॉक बनविणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यांवर चर्चा वाटाघाटीने निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निर्धीचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** मौजे शिर्डी चे गावठान हद्दीत संस्थानची सेवाधाम इमारत साईभक्तांचे निवासासाठी उपलब्ध करणेत आली आहे. सेवाधाम इमारत ही शिर्डीच्या मध्यवर्ती भागात व नगर- मनमाड रोड लगत असल्याने मा. कार्यकारी अधिकारी सो यांनी सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील पालखी रोडच्या बाजूने पुरुष व महिलांकरीता शौचालय व मुताऱ्यांची सोय करणेस सुचना दिल्या आहेत.

**प्रस्तावः-** सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील बाजुने पालखी रोड लगत शौचालय व मुताऱ्यांची व्यवस्था करता येईल. यामध्ये पुरुष व महिलांसाठी प्रत्येकी एक शौचालय, ०७ युरीनल व ०१ वॉशिंग प्लेस बनवता येतील यासाठी त्यामध्ये अंतर्गत फेरबदल व नुतनीकरणाची खालीलप्रमाणे कामे करावे लागतील.

१. इमारतीमधील टॉयलेट ब्लॉकच्या ठिकाणच्या अंतर्गत भिंती व फ्लोअरींग काढणे.
२. प्रत्येकी एक शौचालय व ०७ युरीनलची व्यवस्था करणे.
३. ॲन्टी स्किड फ्लोअरींग व सिरॅमिक टाईल्स बसविणे.
४. अंतर्गत प्लंबींग व इलेक्ट्रीकलची कामे करणे.

सन २०१३-२०१४ चे जिल्हा दरसुची दरानुसार याकामी अंदाजे रक्कम रु. ९,६३,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. याकामी येणाऱ्या खर्चास व विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मा. त्रिसदस्य समितीचे दि.१५/०२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १५९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरहू कामी दि. ०५/०३/२०१४ रोजीचे दैनिक देशदुत व दैनिक पुढारी वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि. २४/०३/२०१४ पर्यंत सिलबंद निविदा सादर करण्याचे अंतीम मुदतीत खालील ठेकेदारांनी निविदा जमा केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | आवक क्र/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री अनिल एम. गवळी, मढी | २१७८४ /२४/०३/२०१४ |
| ०२ | श्री बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव | २१८२८ /२४/०३/२०१४ |
| ०३ | अदील ॲण्ड अरसलान कंस्ट्रक्शन, लोणी | २१८२६/२४/०३/२०१४ |

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, उपस्थित निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**(निविदेतील अंदाजपत्रकीय रक्कम रु.८,७५,४८०/-)**

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील मुळ दर | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेला दर |
|---|---|---|---|
| ०१ | श्री बाबासाहेब पंढरीनाथ शिंदे, पढेगांव | ८,३१,७०६/-<br>(निविदा रकमेत ५% कमी) | ८,०९,८१९/-<br>(निविदा रकमेत ७.५% कमी) |
| ०२ | अदील ॲण्ड अरसलान कंस्ट्रक्शन, लोणी | ८,७५,४८०/-<br>(निविदा रकमेत) | **७,७०,४२२/-**<br>(निविदा रकमेत १२% कमी) |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | श्री अनिल एम. गवळी, मढी | ८,५७,९७०/-<br>(निविदा रकमेत २% कमी) | ८,५७,९७०/-<br>(निविदा रकमेत २% कमी) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे सेवाधाम इमारतीमध्ये साईभक्तांचे सुविधेसाठी टॉयलेट ब्लॉक बनविणेचे काम करुन घेणेसाठी मे.अदील ॲण्ड अरसलान कंस्ट्रक्शन, लोणी यांचे निविदा रकमेवर १२% कमी (रु.७,७०,४२२/-) मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०५ **श्री साई प्रसादालय इमारतीमधील व्हि.आय.पी. डायनिंग हॉल वरील पॉली कार्बोनेट डोमचे नूतनीकरण करणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर चर्चा वाटाघाटीद्वारे निर्णय घेणेबाबत.**

संस्थानचे श्री साईप्रसादालय इमारतीचे पहील्या माळयावरती दक्षिणेकडील हॉलमध्ये व्हि.आय.पी. भक्तांकरीता प्रसाद भोजन व्यवस्था करणेत येते. सदर हॉलकरीता मूळचे प्रसादालय बांधकामामध्ये डोमचे आकर्षक छत तयार करण्यात आलेले आहे. सदर डोमचे मध्यवर्ती भागास नैसर्गिकरित्या प्रकाश येणेकरीता पॉलीकार्बोनेट शिटचे डोम तयार करणेत आले होते. वातावरणाच्या परिणामामुळे सदरचे पॉलीकार्बोनेट शिट खराब झाले असून त्यातून व्हि.आय.पी. डायनिंग हॉलमध्ये काही ठिकाणी पावसाचे पाण्याची गळती होत आहे. याबाबत प्रसादालय विभागाने इकडील विभागास कळविले आहे. श्री साई प्रसादालयाचे व्हि.आय.पी. कक्षातील डोमच्या पॉलीकार्बोनेट शिट बदलून ऐवजी नविन पॉलीकार्बोनेट शिट बसवावे लागणार आहेत.

श्री साईप्रसादालयातील व्हि.आय.पी. डायनिंग हॉलचे एकूण चार छताचे पॉलीकार्बोनेट डोम दुरुस्त करणेसाठी प्रत्येकी रु.१,९०,०००/- प्रमाणे अंदाजे रु.७,६०,०००/- मात्र खर्च येईल. याकामी येणाऱ्या खर्चास व विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मा. त्रिसदस्य समितीचे दि. १३/१२/२०१३ रोजीचे सभेतील नि. क्र. ९३६ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

त्यानुसार दि. ०५/०३/२०१४ रोजीच्या दैनिक पुढारी व दैनिक देशदुत या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली आहे. याकामी दि. २४/०३/२०१४ पर्यंतच्या अंतिम मुदतीत खालील ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | आवक क्र/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | रविंद्र रबर प्रोडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | २१८२९/२४/०३/२०१४ |
| ०२ | श्री प्रल्हाद दास टेंम्भुर्णीकर | २१८२७/२४/०३/२०१४ |
| ०३ | एम.एस. शेल्टर्स, नाशिक | २१८३९/२४/०३/२०१४ |
| ०४ | अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद | २१८३७/२४/०३/२०१४ |

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, उपस्थित निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील मुळ दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | रविंद्र रबर प्रोडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | ४,९६,५५०/- | ४,९५,०००/- |
| ०२ | श्री प्रल्हाद दास टेंम्भुर्णीकर, औरंगाबाद | ४,१२,८९०/- | **३,४९,०००/-** |
| ०३ | एम.एस. शेल्टर्स, नाशिक | ६,३१,०५६.२५ | ६,३१,०००/- |
| ०४ | अथर्व ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद | ७,४९,००१.९० | ४,०१,५००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय इमारतीमधील व्हि.आय.पी. डायनिंग हॉल वरील पॉली कार्बोनेट डोमच्या नूतनीकरणाचे काम करुन घेणेसाठी श्री.प्रल्हाद दास टेंम्भुर्णीकर, औरंगाबाद यांचे रु.३,४९,०००/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०६ **श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाकरिता रिपोर्टीगसाठी व्हीजार्ड/ Extra Dicom Viewer खरेदीकामी प्राप्त कोटेशनवर चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाने दि.१४/०६/२०१३ रोजीचे मागणी पत्रान्वये रुग्णांचे सि.टी. स्कॅन व एम.आर.आय. केल्यानंतर रिपोर्टीगसाठी एक अदयावत व्हीजार्ड/ Extra Dicom Viewer ची ०१ नगाची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे Siemens कंपनीचा व्हीजार्ड आहे, परंतु त्याची क्षमता कमी असल्यामुळे सर्व रुग्णांचे स्कॅन त्यावर साठवुन ठेवता येत नाही. तसेच ३ ते ४ दिवसांनंतर रुग्णास डुप्लीकेट फिल्मची आवश्यकता भासल्यास फिल्म देण्यासाठी साठवुन ठेवलेला

डाटा आपल्याकडे उपलब्ध नसतो. रिपोर्टींग फिल्मवर करताना चुक होण्याची शक्यता असते. अशा अनेक अडचणींमुळे त्यांनी नवीन अदयावत Extra Dicom Viewer ची मागणी केलेली आहे.

सदर Extra Dicom Viewer खरेदीकामी M/s. Airox Technologies Pvt. Ltd., Aurangabad यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानुसार सदरचे खरेदीकामी रक्कम रु.२,५०,२१५/-इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Extra Dicom Viewer- Computer 27" latest model. 3.2 Ghz quad core intel core i5 processor (Turbo boost upto 3.6 Ghz), with 6 MB L3 cache (two 4GB) of 1600MHz DDR3 memory, 1TB(7200 rpm) hard drive, NVIDA Geforce GTX675MX Graphic Procesoor with 1 GB of GDDRS memory & Latest software like OSIRIX V5.0.2. | 01 | 2,50,215.00 | 2,50,215.00 |

दि.०८/१०/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. ७२४ अन्वये वरील मागणीप्रमाणे Extra Dicom Viewer ०१ नग विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२,५०,२१५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र.४३८८ दि.०८/११/२०१३ अन्वये एकुण ०६ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांचेकडुन दि.२३/११/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत -

१. M/s. Airox Technologies, Aurangabad (ई-मेल कोटेशन प्राप्त दि. २०/०२/२०१४)
२. M/s. Action Engineering, Mumbai (ई-मेल कोटेशन प्राप्त दि. २०/०२/२०१४)
३. M/s. Mednet AGS, Vasai(W) (ई-मेल कोटेशन प्राप्त दि. २०/०२/२०१४)

वरील पैकी अ.न. २ व ३ यांना कोटेशन मागणीपत्र नसताना त्यांनी स्वत:हुन कोटेशन पाठवलेले आहे व तीनही कोटेशन ई-मेल द्वारे प्राप्त झालेले आहे. परंतु तुलनात्मक दर मिळणेच्या दृष्टीने याचा फायदा होऊ शकेल. त्यामुळे तीनही कोटेशन विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ कोटेशन्सचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला. परंतु चर्चा/ वाटाघाटीसाठी कोटेशन्सधारकांना समक्ष सभेपुढे बोलविणेत आले असता एकही कोटेशनधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित नव्हते.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | मॉडेल | कोटेशनमधील मुळ दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | M/s. Airox Technologies, Aurangabad | Apple imac core- I5 | २,४५,५०१/- |
| ०२ | M/s. Action Engineering, Mumbai | core- I5 | १,९९,५००/- |
| ०३ | M/s. Mednet AGS, Vasai (W) | core- I5 | २,१८,४००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाकरिता रिर्पोटींगसाठी व्हीजार्ड/ Extra Dicom Viewer खरेदीकामी उपसमिती सभेपुढे चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी एकही कोटेशनधारक उपस्थित नसल्यामुळे सदरहू खरेदीकामी उपरोक्त कोटेशनधारकांना पुढील उपसमिती सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०७ श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वॉर्डकरिता Non Stress Test Machine with Probe खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वॉर्डमध्ये अत्यवस्थ रुग्णांकरीता त्यांनी दि.०३/०८/२०१३ रोजीचे मागणी पत्रकान्वये Non Stress Test Machine with Probe एक नगाची मागणी केलेली आहे. कारण सध्या श्री साईनाथ रुग्णालयात अशा प्रकारचे मशिन उपलब्ध नाही. सदर मशिनचा उपयोग गर्भवती महिलांमध्ये त्यांची Stress Test (हृदयाचे काम व्यवस्थित चालु आहे किंवा नाही हे पहाणे) ची तपासणी करणेसाठी होतो त्यामुळे उपचार व प्रसुती व्यवस्थित करणे सोईचे होते. विशेषत: High Risk Obsteric patient साठी याचा जास्त फायदा होईल. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. |
|---|---|---|
| 1. | Non Stress Test Machine with Probe (NST Machine) with all Standard Accessories | 01 No. |

वरील प्रमाणे Non Stress Test Machine with Probe खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानुसार वरीलप्रमाणे मशिन खरेदीकामी अंदाजे १,२३,७५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. १३/१२/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय क्र.९५६ अन्वये उपरोक्त १ नग Non Stress Test Machine with Probe विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२३,७५०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ६४११ दि. ०८/०१/२०१४ अन्वये एकुण ०६ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून दि.३१/०१/२०१४ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

०१. M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar (कोटेशन प्राप्त दि.०५/०३/२०१४)
०२. M/s. G. G. Medicaid, Ahmednagar (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.०५/०३/२०१४)
०३. M/s. BMV Meditech Pvt. Ltd., New Delhi (टपालाद्वारे उघडून प्राप्त कोटेशन दि.२८/०२/२०१४)

वरीलपैकी अ. नं. २ व ३ यांना कोटेशन मागणीपत्र नसताना त्यांनी स्वतःहून कोटेशन पाठविलेले आहे. परंतु तुलनात्मक दर मिळणेच्या दृष्टीने त्यांचा फायदा होईल, त्यामुळे ते कोटेशन विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले २ सिलबंद कोटेशन आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, तीनही कोटेशन्सचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला. परंतु चर्चा/ वाटाघाटीसाठी कोटेशन्सधारकांना समक्ष सभेपुढे बोलविणेत आले असता एकही कोटेशनधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित नव्हते.

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नांव** | **मॉडेल** | **कोटेशनमधील मुळ दर रु.** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| ०१ | M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar | BPL FM9853 | 1,12,500/- | 2 years warranty |
| ०२ | M/s. G. G. Medicaid, Ahmednagar | BPL FM9853 | 1,23,750/- | 1years warranty |
| ०३ | M/s. BMV Meditech Pvt. Ltd., New Delhi | FEMO 730 | 1,56,450/- | 1years warranty |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक वॉर्डकरिता Non Stress Test Machine with Probe खरेदीकामी उपसमिती सभेपुढे चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी एकही कोटेशनधारक उपस्थित नसल्यामुळे सदरहू खरेदीकामी उपरोक्त कोटेशनधारकांना पुढील उपसमिती सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०८. भांडार विभागात गोडाऊनमध्ये खाद्यतेल साठविणेकरीता स्टेनलेस स्टील ट्रे तयार करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दि.२१-०६-२०१३ चे सभेतील विषय क्र.५३ निर्णय क्र.४८६ अन्वये भांडार विभागात गोडाऊनमध्ये खाद्यतेल साठविणेकरीता स्टेनलेस स्टील ट्रे बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,७२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/ विद्युत /५५५०/ २०१४ दि.०४-०३-२०१४ अन्वये बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून पत्र पाठवून कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत. कोटेशन सबमिट करतेवेळी ठेकेदारांनी अर्नेस्ट मनी डिपॉझीट रक्कम रु.३,०००/- व कोटेशन फॉर्म रक्कम रु.५००/- अशा प्रकारे दोन्ही रकमा भरल्याचा पुरावा कोटेशन फॉर्म सोबत जोडणे आवश्यक राहील असे त्यांना पाठविलेल्या कोटेशन फॉर्मच्या सोबतच्या पत्रात नमुद करण्यात आलेले आहे. तसेच वेबसाईटवर कोटेशन नोटीस दि.०४-०३-२०१४ रोजी अपलोड केलेली होती. वेबसाईटवर ही जाहिरात दि.२५-०३-२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती. कोटेशनची विक्री दिनांक ०५-०३-२०१४ ते दि. २२-०३-२०१४ अशी होती.

त्यानुसार खालीलप्रमाणे तीन फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकाची कोटेशन मुदतीत प्राप्त झालेली आहे. कोटेशनचा तपशील अनुक्रमे खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कोटेशन धारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.प्रेस व्हॅक स्ट्रील इंडस्ट्रीज , माळेगांव, सिन्नर |
| ०२) | मे. अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स , औरंगाबाद |
| ०३) | मे.शुभम स्टील रेलींग ॲण्ड फर्निचर, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे भांडार विभागात गोडाऊनमध्ये खाद्यतेल साठविणेकरीता स्टेनलेस स्टील ट्रे बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी प्राप्त झालेली ०३ कोटेशन्स आजचे

उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नांव** | **कोटेशनमधील मुळ दर रु.** | **चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेला दर रु.** |
|---|---|---|---|
| ०१ | मे.प्रेस व्हॅक स्ट्रील इंडस्ट्रीज, माळेगांव, सिन्नर | २,७४,८३८/- | २,६०,८३८/- |
| ०२ | मे. अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद | ३,३०,०७५/- | ३,००,०००/- |
| ०३ | मे.शुभम स्टील रेलींग ॲण्ड फर्निचर, नाशिक | ३,२०,०९०/- | **२,२०,०००/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, भांडार विभागात गोडाऊनमध्ये खाद्यतेल साठविणेकरीता स्टेनलेस स्टील ट्रे तयार करणेकामी मे.शुभम स्टील रेलींग ॲण्ड फर्निचर, नाशिक यांचे रु.२,२०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०९ **हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करणेकामी प्राप्त दरपत्रक उघडून निम्नत्तम पुरवठार यांचेकडून दर मान्य करणेबाबत.**

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**प्रास्ताविकः-** श्री साईप्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजन बनविणेकामी प्रसादालयातील आटा, गहू, लाडुप्रसाद मटेरियल, नाष्टापाकिट मटेरियल, भाजीपाला व प्रसादभोजन मटेरीयल वाहणेकामी एकुण सहा हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करणेस व त्याकामी रक्कम रु. २ लाख पर्यंतच्या खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक ४.२.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १२४ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनुसार हायड्रोलिक पॅलेट ट्रकचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादार खालील पुरवठादार यांचेकडून निलकमल कंपनीचे सहा नग BF११५०५५०८५YEL मॉडेलच्या हायड्रोलिक पॅलेट ट्रकचे दरपत्रक मागविणेत आलेले आहे.

०१. निलकमल लि. नाशिक-४२२१०१

०२. महेश इंजिनिअर्स, सातपुर, नाशिक-४२२ ००७

०३. विजय नॉव्हल्टीज, नाशिक - ४२२ ००१

**मागणीः-** निलकमल कंपनीचे हॉयड्रोलिक पॅलेट ट्रक पुरवठा करणाऱ्या उपरोक्त तीन एजन्सीकडून दरपत्रक प्राप्त झालेले आहे. प्राप्त दरपत्रक उघडून निम्नत्तम पुरवठादार यांचे कडून सहा नग हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करता येतील. मा. त्रिसदस्यीय समिती सभा दिनांक ८.१०.२०१३ मधील निर्णय क्रं. ८०५ व जा.नं.एसएसएस/वशि-आस्था/३०२२/२०१३ दिनांक १३.१२.२०१३ रोजीचे आदेशान्वये रक्कम रु.२५००१/- ते रु. १०,००,०००/- पर्यंतचे दरपत्रकांवर निर्णय घेणेकामी संस्थान अधिकारी यांची उपसमिती नेमणेत आलेली आहे. सदर दरपत्रक उपसमिती सदस्यांच्या सभेत उघडून निर्णय घेता येईल.

श्री साईप्रसादालयाकरीता सहा नग निलकमल कंपनीच्या हायड्रोलिक पॅलेट ट्रक खरेदी करणेकामी प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **तपशील** | निलकमल लि. नाशिक | महेश इंजिनिअर्स, सातपुर, नाशिक | विजय नॉव्हल्टीज, नाशिक |
|---|---|---|---|---|
| ०१ | दरपत्रक प्रती हायड्रोलिक पॅलेट ट्रक दर रु. | १८,५००/- सर्व करांसह | १९,३००/- | २१,३२०/- सर्व करांसह |
| ०२ | व्हॅट | | २४१२.५० | |
| ०३ | एकुण | १८,५००/- | २१,७१२.५० | २१,३२०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दरपत्रकधारकांनी दिलेल्या दरामध्ये आणखी सुट मिळण्याच्या उद्देशाने उपरोक्त दरपत्रकधारकांना पुढील उपसमिती सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

१० **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी टेबल खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील प्रयोग शाळेकरीता आवश्यक टेबल खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.४,७१,५००/- (अक्षरी रु. चार लाख ऐकाहत्तर हजार पाचशे) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०८.०१.२०१४ मधील निर्णय क्र.३९ नुसार मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव दि.२०.०२.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता.

कनिष्ठ महाविद्यालयाने कळविलेल्या मागणी पैकी अ.नं. १ ते ६ मधील टेबलची कंपनी व स्टँडर्ड (नियमीत) साईज नमुद नसल्यामुळे त्याची खरेदी कोटेशन मागवून करता येणे शक्य नाही, मात्र अ.नं.७ मध्ये नमुद केलेल्या टेबलची साईज ही स्टँडर्ड असल्यामुळे त्याची खरेदी खरेदी विभागामार्फत करता येईल. याबाबत कनिष्ठ महाविद्यालयास इकडील दि.०६.०२.२०१४ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. तसेच त्यांचेकडून अ.नं.१ ते ६ मधील टेबलच्या साईजची पुर्तता करुन प्रस्ताव पुर्नप्राप्त झाल्यानंतर त्याची खरेदी करता येईल.

तरी कनिष्ठ महाविद्यालयाने कळविलेले मागणीपैकी अ.नं.०७ गोदरेज टेबल सनमायका टॉप (T-८, सिंगल ड्रावर ४ x २ x २.५ फुट) खरेदीकामी संस्थानचे नियमीत पुरवठाधारकांच्या पत्त्यांवर कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून सिलबंद पाकिटात दरपत्रक मागणी करणेत आलेली होती. त्याची अंतीम मुदत दि.२०.०३.२०१४ अशी ठेवलेली होती. मुदतीअंती तीन दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.रोहण एंटरप्रायझेस, अहमदनगर | २१४५१/१८.०३.२०१४ |
| ०२. | मे.साई एंटरप्राझेस, अहमदनगर | २१४९०/१९.०३.२०१४ |
| ०३. | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | २१४९१/१९.०३.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.नं. | तपशील | दरपत्रकामधील दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर प्रती नग रु. |
|---|---|---|---|
| | गोदरेज टेबल, सनमायका टॉप, सिंगल ड्राव्हर T-८ (४x२x२.५) फुट, १५ नग | | |
| ०१ | मे.रोहण एंटरप्रायझेस, अहमदनगर | ९,८००/- | ९,६७५/- |
| ०२ | मे.साई एंटरप्राझेस, अहमदनगर | ९,४८९/- | **९,४०९/-** |
| ०३ | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | ९,९००/- | ९,८००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे १५ नग टेबल खरेदीकामी मे.साई एंटरप्राझेस, अहमदनगर यांचे प्रती टेबल रु.९,४०९/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

---

११ **ऑफिस कपाट, टेबल व रिव्हॉलव्हींग चेअर (खुर्ची) खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०२.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.१४३ नुसार संरक्षण विभागाकरिता गोदरेज कंपनीचे कपाट, ऑफिस टेबल व हाय बॅक रिव्हॉल्वींग चेअर खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी दि.२०.०३.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता.

त्यानुसार संस्थानचे नियमीत पुरवठाधारकांच्या पत्त्यावर कोटेशन/दरपत्रक मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून सिलबंद पाकिटात दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्याची अंतीम मुदत दि.०३.०४.२०१४ अशी ठेवलेली होती. मुदतीअंती पाच दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.महालक्ष्मी ट्रेडर्स, श्रीरामपुर | ००६८/०१.०४.२०१४ |
| ०२. | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | ००६९/०१.०४.२०१४ |
| ०३. | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | ००७०/०१.०४.२०१४ |
| ०४ | मे.रोहण एंटरप्रायझेस, अहमदनगर | ०२५३/०३.०४.२०१४ |
| ०५ | मे.स्वान इलेक्ट्रो मेक सिस्टीम, नाशीक | ०२५४/०३.०४.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०५ दरपत्रके आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | **ऑफिस कपाट** (पर्सनल लॉकर) गोदरेज, ४ डोअर, PLU with Lock | | **ऑफिस टेबल** गोदरेज, मॉ.नं. T- १०४ | | **हायबॅक रिव्हॉल्वींग चेअर** गोदरेज, मॉ.नं. ७१०१ R | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.महालक्ष्मी ट्रेडर्स, श्रीरामपुर | दरपत्रकामधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. | दरपत्रकामधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. | दरपत्रकामधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेला दर रु. |
| ०१ | मे.महालक्ष्मी ट्रेडर्स, श्रीरामपुर | १२,१००/- | अनुपस्थित | २०,०००/- | अनुपस्थित | ८,२००/- | अनुपस्थित |
| ०२ | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | ११,६१९/- | **११,५१९/-** | १९,६९९/- | १९,५९९/- | ७,५९९/- | ७,५९९/- |
| ०३ | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | १२,१५१/- | १२,१५०/- | १९,९५०/- | १९,९५०/- | ७,९५०/- | ७,९५०/- |
| ०४ | मे.रोहण एंटरप्रायझेस, अहमदनगर | ११,९००/- | ११,७००/- | १९,७५०/- | **१९,५००/-** | ६,५००/- | **६,४२५/-** |
| ०५ | मे.स्वान इलेक्ट्रो मेक सिस्टीम, नाशीक | १२,६३९/- | अनुपस्थित | २१,८५८/- | अनुपस्थित | ८,१७०/- | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संरक्षण विभागाकरिता आवश्यक असलेले गोदरेज कंपनीचे कपाट, ऑफिस टेबल व हायबॅक रिव्हॉल्वींग चेअर खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१२ संगणक प्रि-प्रिंटेड मोफत भोजन तिकीटे (प्रि-प्रिंटेड कंटीन्युअस) छपाईबाबत प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०२.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.१२२ नुसार श्री साई प्रसादालयासाठी आवश्यक असणारी संगणक प्रि-प्रिंटेड मोफत भोजन तिकीटांची (प्रि-प्रिंटेड कंटीनयुअस) ४० लाख फॉर्म्स विहित पद्धतीने छपाई करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,२०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी दि.१९.०३.२०१४ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार संस्थानचे नियमित छपाईधारकांच्या पत्त्यावर कोटेशन/दरपत्रक मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून सिलबंद पाकिटात दरपत्रके मागणी करण्यात आलेली होती. त्याची अंतीम मुदत दि.०२.०४.२०१४ अशी ठेवलेली होती. मुदतीअंती पाच दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.राका प्रिंटर्स, नाशीक | २२२१९/३१.०३.२०१४ |
| ०२. | मे.नॅशनल पेपर इंडस्ट्रीज, कोल्हापुर | ००६५/०१.०४.२०१४ |
| ०३. | मे.कबीर एंटरप्रायझेस, कोल्हापुर | ००७४/०१.०४.२०१४ |
| ०४ | मे.माई प्रिंटर्स, पुणे | ०११२/०२.०४.२०१४ |
| ०५ | मे.ओम प्रिंटर्स, कोपरगाव | ०१७९/०२.०४.२०१४ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०५ दरपत्रके आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केला.

| अ.नं. | तपशील | दरपत्रकामधील दर रु.पैसे | चर्चेअंती देऊ केलेला दर रु.पैसे |
|---|---|---|---|
| संगणक प्रि-प्रिंटेड मोफत भोजन तिकिटे<br>टिएनपीएल, ८० जीएसएम, पिवळा रंग, ६"x२" (१५cm x ०५cm, ४० लाख फॉर्म्स) | | | |
| ०१. | मे.राका प्रिंटर्स, नाशीक | ०.०८० | ०.०३९ |
| ०२. | मे.नॅशनल पेपर इंडस्ट्रीज, कोल्हापुर | ०.०७१ | अनुपस्थित |
| ०३. | मे.कबीर एंटरप्रायझेस, कोल्हापुर | ०.०७५ | अनुपस्थित |
| ०४ | मे.माई प्रिंटर्स, पुणे | ०.०४२ | ०.०३८ |
| ०५ | मे.ओम प्रिंटर्स, कोपरगाव | ०.०५० | ०.०४८ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयासाठी आवश्यक असणारी संगणक प्रि-प्रिंटेड मोफत भोजन तिकीटांची (प्रि-प्रिंटेड कंटीन्युअस) ४० लाख फॉर्म्सची छपाई करणेकामी मे.माई प्रिंटर्स, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१३ **मंदिर परिसरातील सुरक्षा यंत्रणेचे ऑडीट करणेबाबत.**

संस्थान परिसरात मंदिराचे आतील व बाहेरील बाजुस नविन कंट्रोल रुममार्फत १२ PTZ व ८९ फिक्स कॅमेरे असे एकुण १०१ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. तसेच मंदिर परिसर व दर्शन रांगेतील साईभक्तांकडे असलेल्या बॅगा, पर्स चेक करण्यासाठी ०२ बॅगेजेस स्कॅनर मशिन, डिएफएमडी, एचएचएमडी, टर्न स्टाईल, इत्यादी तांत्रिक साहित्य बसविण्यात आलेले आहे. यासाठी संस्थानने ४.५ कोटी खर्च करुन अद्यावत सुरक्षा यंत्रणा विकसित केलेली आहे.

त्यानुसार मे. विराज सेक्युरीटी सोल्युशन यांनी ऑडीट संदर्भात पत्र दिलेले होते. यासंदर्भात संबंधीत कंपनीशी संपर्क साधला असता त्यांनी सीसीटीव्ही कंट्रोलरुम व अद्यावत बसविण्यात आलेल्या सुरक्षा यंत्रणेचे ऑडीट करण्यास सहमती दिली आहे. त्यानुसार ते सदर सिस्टीमची तांत्रिक वापराबाबतचे ऑडीट करुन तांत्रिक अहवाल सादर करणार आहे. त्या अहवालानुसार, सदर सिस्टीमचा वापर योग्य तथा तत्परतेने करता येईल असे नम्र मत आहे.

सदर विराज कंपनीमध्ये तांत्रिक स्टाफ (कर्मचारी/इंजिनीअर) आहे. शिवाय CISF या नामांकित सरकारचे सुरक्षा यंत्रणेचे अधिकारी उपलब्ध आहे. ते मंदिर सुरक्षासाठी बसविण्यात आलेल्या यंत्रणेचे खालील मुद्दांच्या आधारे आडीट करणार आहे.

- Visual inspection off all equipments,
- Assess the CCTV system Inventory, schematic and line diagrams,
- Assess the CCTV system network topology and bandwidth requirements,
- Site plans and Operational Requirements (OR) conformance,
- System user audit,
- Assessment of operation and Maintaenance Manual,
- Updation of drawings as the system may have evolved over time,
- Are CCTV operators suitably trained with the provision of easy to follows user instructions,
- Suitability of UPS and battery Backup provision for system,
- Database and integrity of system,
- Version of software operating system,
- Inspesction and maintenance on security and access control hardware,
- Inspection and maintenance on digital serveillance hardware,
- Provision of inspection and test reports,
- Integration options between various security systems.

या ऑडीटसाठी त्यांनी दि. १७/०३/२०१४ रोजी ई-मेलद्वारे प्रस्ताव पाठविलेला आहे. सदर सेक्युरीटी सिस्टीमचे ऑडीटसाठी त्यांनी सर्व खर्च समाविष्ट रक्कम रु. २,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार) मात्र इतकी मागणी केलली असुन सदरचे रक्कमेवर ते चर्चा-तथा-वाटाघाटी करणेस तयार आहे.

तरी मे. विराज सेक्युरीटी सोल्युशन यांचेमार्फत ऑडीट करणेकामी त्यांना समक्ष बोलावुन यथायोग्य निर्णय होणेसाठी मा.त्रिसदस्य समितीसमोर सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील सुरक्षा यंत्रणेचे ऑडिट करणेकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, निविदा मागविणेत याव्यात, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सीसीटीव्ही कंट्रोल सेल)

---

**विषय नं.०३ नोंद घेण्याचे विषय-**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता माहे जानेवारी-२०१४.**

**(ब) माहे फेब्रुवारी-२०१४ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

माहे, जानेवारी-२०१४ मधील जमा रु.४५,६६,३५,४२८/- आणि खर्च रु.१८,३४,२४,४३४/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे जानेवारी-२०१४ मधील रुपये ४,४४,९३७/- चा तक्ता, संस्थानची गुंतवणूक दि.३१.०१.२०१४ रु.१०,५७,६४,५०,०३३/- चा तक्ता. तसेच श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तु यांच्या विक्रीचा माहे फेब्रुवारी-२०१४ मधील रु.३,०८,६६०/- मात्र अहवालाच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२६५ (A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**०२. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे फेब्रुवारी- २०१४ मध्ये वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

श्री साईबाबा रुग्णालयात माहे फेब्रुवारी- २०१४ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रु.७३,८९,१०९/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**प्रस्ताव-** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्पाची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. दिनांक ०४/०२/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. १३९ नुसार, साईटेक प्रकल्प अहवाल व सद्यस्थिती याची माहिती घेणेकामी श्री.के.व्ही.रमणी सो., अध्यक्ष तांत्रिक सल्लागार समिती, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधी, माहीती तंत्रज्ञान विभाग विभागप्रमुख व कार्यकारी अधिकारी सो., यांची मा.अध्यक्ष महोदय यांचेबरोबर एकत्रित बैठक आयोजित करण्यात यावी व त्यानंतर प्रस्तावित बीलाबाबत निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. तसेच माहीती तंत्रज्ञान विभागाने या प्रकल्पामध्ये आजपर्यंत झालेल्या कामाचा सविस्तर अहवाल सादर करावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन दिनांक १५/०३/२०१४ रोजी मा. त्रिसदस्य समिती समवेत मा. श्री. के. व्ही. रमणी सो., अध्यक्ष तांत्रिक सल्लागार समिती व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस पुढीलप्रमाणे मान्यवर/ अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

| अ.नं. | अधिकारी / कर्मचारी नाव | पदनाम |
|---|---|---|
| ०१ | मा. श्री. जयंत दत्तात्रय कुलकर्णी सो., | मा. मुख्य जिल्हा न्यायाधीश सो., अहमदनगर-तथा-अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी. |
| ०२ | मा. श्री. अनिल कवडे सो., | मा. जिल्हाधिकारी सो., अहमदनगर-तथा-सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी. |
| ०३ | मा. श्री. के. व्ही. रमणी सो., | अध्यक्ष- तांत्रिक सल्लागार समिती. |
| ०४ | मा. श्री. अजय मोरे सो., | मा. कार्यकारी अधिकारी सो., श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी. |
| ०५ | मा. श्री आप्पासाहेब शिंदे सो., | मा.उप-कार्यकारी अधिकारी सो., श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी. |
| ०६ | मा. श्री. राजीव वैष्णव | सदस्य- तांत्रिक सल्लागार समिती. |
| ०७ | मा. श्री. बी. डी. साबळे सो., | प्रशासकीय अधिकारी |
| ०८ | मा. श्री. एस. व्ही. गमे सो., | प्र. प्रशासकीय अधिकारी |
| ०९ | मा. श्री. एस. एन. गर्कळ सो., | प्र. प्रशासकीय अधिकारी |
| १० | मा. श्री. यु. पी. गोंदकर सो., | प्र. प्रशासकीय अधिकारी |
| ११ | मा. श्री. डी. टी. उगले सो., | प्र. प्रशासकीय अधिकारी |
| १२ | मा. श्री. एस. लंके | प्र. मुख्यलेखाधिकारी |
| १३ | श्री. के. एस. गवळी | प्र. माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख |
| १४ | श्री. आर. सी. पुजारी | तांत्रिक सहाय्यक |
| १५ | श्री. ऐ. के. शिंदे | तांत्रिक सहाय्यक |
| १६ | श्री. एस. एस. जोरी | तांत्रिक सहाय्यक |
| १७ | श्री.संदिप भाले | कॉग्नीझंट, प्रतिनीधी |
| १८ | श्री.लक्ष्मण वऱ्हाडकर | कॉग्नीझंट, प्रतिनीधी |
| १९ | श्री.प्रदिप सदरे | कॉग्नीझंट, प्रतिनीधी |
| २० | श्री.अशिष मुजुमदार | कॉग्नीझंट, प्रतिनीधी |
| २१ | श्री.अमित भार्गव | कॉग्नीझंट, प्रतिनीधी |
| २२ | श्री.सतिष साठवणे | कॉग्नीझंट, प्रतिनीधी |
| २३ | श्री.कुणाल विश्वकर्मा | कॉग्नीझंट, प्रतिनीधी |

उपरोक्त बैठकीचे दरम्यान साईटेक प्रकल्पावर सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

**बैठकीचे सुरवातीस आयटी कमिटीचे अध्यक्ष मा.श्री.के.व्ही.रमणी सो., यांनी प्रकल्पाची सर्व पार्श्वभुमी व सद्यस्थिती विषद करणारे सादरीकरण सादर केले. सदर सादरीकरणामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश होता, तसेच सादरीकरणाची प्रत सोबत जोडलेली आहे -**

१. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या एकुण ३८ कार्यप्रणालीपैकी (ऑनलाईन सर्व्हिसेससह) २७ कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत.

२. आठ कार्यप्रणालींमध्ये आवश्यक असणारे बदल करण्याचे काम कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून पुर्ण झालेनंतर सदरच्या कार्यप्रणाली वापरात येतील.

३. उर्वरीत तिन कार्यप्रणाली या संस्थानकडून आवश्यक त्या पुर्तता झालेनंतर कार्यान्वीत करण्यात येतील, परंतु सदरच्या कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक पुर्तता संस्थानने प्रकल्प संपण्याच्या पुरेशा वेळेआधी करणे गरजेचे आहे.

४. प्रकल्प कार्यान्वीत करण्याकरिता विविध कारणांमुळे विलंब झालेला आहे, त्यामध्ये प्रामुख्याने जागेमधील बदल, विभागांकडून येणाऱ्या मागणीमधील बदल, कॉग्नीझंट कंपनीकडून नेमण्यात आलेल्या स्टाफमध्ये वारंवार होणारा बदल यांचा समावेश आहे. आतापर्यंत झालेला विलंब हा दोन्ही बाजुकडील कारणांमुळे झालेला असुन, येथुनपुढे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे व संस्थानने समन्वयातून काम करुन प्रकल्पाअंतर्गत सर्व कार्यप्रणाली व इतरअनुषंगिक कामे दि. ३०/०४/२०१४ पर्यंत पुर्ण करावीत.

५. संस्थानने कार्यप्रणालीमध्ये असणाऱ्या अडचणी/उणीवा तसेच आवश्यक बदल यापुर्वीच कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांला दिलेले आहेत. सदरच्या सुधारणा करण्याचे काम कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे कडून अंतिम टप्प्यात आहे. सदरच्या सर्व सुधारणा संबधीचे कामकाज कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी ३०/०४/२०१४ पर्यंत पुर्ण करावे व सर्व कार्यप्रणाली या ०१/०५/२०१४ पासुन वापरण्यास परिपुर्ण व सुटसुटीत कराव्यात. दि.३१/०५/२०१४ पर्यंत सर्व कार्यप्रणालींच्या वापरानंतर संबधीत विभागाचे विभाग प्रमुख व युजर हे कार्यप्रणालीबाबतचे अभिप्राय माहीती तंत्रज्ञान विभागास देतील.

६. कार्यप्रणालीमध्ये येणाऱ्या अडचणी तसेच असणाऱ्या त्रुटी या वेळोवेळी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कळविल्या जातात सदरच्या अडचणी/त्रुटी यांची Tracker Sheet मध्ये नोंद घेण्यात येते, तसेच याअडचणींचे निरसण झालेबाबतची नोंद Tracker Sheet मध्ये नोंद घेण्यात येते.

मा.श्री.के.व्ही रमणी सो. यांचे उपरोक्त सादरीकरणावर सविस्तर चर्चेअंती त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनानुसार प्रकल्पाची पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश मा.व्यवस्थापन समितीने दिलेले आहेत.

**उपरोक्त सादरीकरणानंतर मा.श्री.के.व्ही रमणी सो. यांनी साईटेक प्रकल्प अधिक गतिमान व सुरळीत होणेसाठी पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले व त्यावर सविस्तर चर्चा होऊन मा.व्यवस्थापन समितीने कार्यवाही करणेबाबतचे निर्देश दिलेले आहेत -**

१. साईभक्तांचा ऑनलाईन सर्व्हिसेसला वाढता प्रतिसाद व शिर्डी येथे वाढणारी साईभक्तांची गर्दी यामुळे सध्या वापरात असणारा सर्व्हरची क्षमता अपुरी पडत आहे, सबब कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी भविष्यातील साईभक्तांची वाढती संख्या लक्षात घेऊन सर्व्हरचे अपग्रेडेशनचा प्रस्ताव सादर करावा.

२. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे सप्टेंबर २०१३ पासूनचे बील त्यांना अदा करण्यात आलेले नाही तसेच माहे जानेवारी २०१३ ते ऑगष्ट २०१३ पर्यंत त्यांचे बीलातून कपात केलेली रक्कमही त्यांना अदा करण्यात आलेली नाही सबब कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना सदरचे प्रकल्पावर खर्च करणे अवघड होत आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांची माहे जानेवारी २०१३ ते ऑगष्ट २०१३ पर्यतची कपात केलेली मासीक बीलातील रक्कम तसेच माहे सप्टेंबर २०१३ ते नोव्हेंबर २०१३ ची बीले त्यांना त्वरीत अदा करण्यात यावीत. माहे डिसेंबर २०१३ पासूनची बीले सर्व कार्यप्रणालीतील अडचणींचे निरसण व वापरण्यास परिपुर्ण, सुटसुटीत झालेची खात्री करुन अदा करण्यात यावीत.

३. साईटेक प्रकल्पाअंतर्गत इंटरनेट सेवेसाठी रिलायन्स व एअरटेल यांची लिंक घेण्यात आलेली होती तथापि रिलायन्स कंपनीकडून समाधानकारक सेवा मिळत नसलेकारणाने मा.कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार त्यांची लिंक बंद करण्यात आलेली आहे. रिलायन्स कपंनीऐवजी बीएसएनएलची १० एमबीपीएसची लिंक इंटरनेट साठी घेण्यात आलेली आहे. परंतु बीएसएनएल ने सदर सेवेसाठी इतर कंपन्यांच्या तुलनेत जास्त रक्कम घेतली असलेने तसेच कोणतीही बँक गॅरंटी व सेक्युरीटी डिपॉजीट संस्थानकडे जमा केले नसल्याने मा.श्री.के.व्ही रमणी सो., यांनी सदरची लिंक अपग्रेड करणेसंबधी अथवा कालावधी वाढवून मिळणेकामी बीएसएनएल कपंनीशी चर्चा करणेस सुचविलेले आहे.

४. तसेच पर्यायी लिंक तातडीने कार्यान्वीत करण्यात यावी, यासाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना विचारणा केली असता एअरटेल व्यतिरीक्त दुसरा कोणताही आयएसपी शिर्डीमध्ये इंटरनेट सेवा देण्यास इच्छुक नाही असे सांगितले. संस्थानला एअरटेल व रणछोडराय कम्युनिकेशन लि. या दोन कंपन्यांचे निविदा प्राप्त झालेले आहे. पैकी रणछोडराय कम्युनिकेशन लि. या कंपनीचे दर न्युनतम आहेत. परंतु रणछोडराय कम्युनिकेशन लि.चे नाव परिचीत नसलेकारणाने एअरटेल यांना रणछोडराय कम्युनिकेशन लि.यांचे दरानुसार सेवा देणेसंबधी विनंती करावी व दोन्ही कंपनीचे प्रतिनीधींना मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांचेसमोर बोलावून वाटाघाटीअंती पुढील कार्यवाही करावी.

५. देणगी काउंटर, कापड विक्री केंद्र इत्यादी ठिकाणी क्रेडीट/डेबीट कार्ड स्वीपींग मशीन उपलब्ध केल्यास साईभक्तांची सोय होऊन कार्यप्रणालीचाही वेग वाढेल सबब लेखाशाखा विभागामार्फत सदरच्या ठिकाणी क्रेडीट/डेबीट कार्ड स्वीपींग मशीन बसविण्यात यावेत.

६. दिवसेंदिवस माहीती तंत्रज्ञानात होणारे बदल व साईभक्तांची वाढती संख्या यांचा विचार करता साईटेक प्रकल्पासाठी प्रत्येक वर्षी अंदाजपत्रकामध्ये स्वतंत्र तरतुद करण्यात यावी. या संदर्भात माहीती तंत्रज्ञान विभाग व लेखाशाखा विभागाने कार्यवाही करावी.

७. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी साईटेक प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी त्यांना वाढीव खर्च आला असलेने सदरचा खर्चाची मागणी त्यांनी यापुर्वी संस्थानकडे केलेली आहे, यावर सविस्तर चर्चा झालेनंतर सदरची तपशीलवार मागणी नव्याने मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवावी, असे निर्देश देण्यात आले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेउन मा.उच्च न्यायालय यांचेकडे मान्यतेसाठी पाठविता येईल.

८. संस्थानचे नेटवर्कसाठी सध्या दोन वेगवेगळे केबलचे मार्ग तसेच दोन्ही केबलच्या मार्गात अडथळा निर्माण झाल्यास WiMax टॉवरचा उपयोग करण्यात येत आहे, याशिवाय WiFi तंत्रज्ञानाचा उपयोग आवश्यक वेळी करण्यात यावा, असे माहीती तंत्रज्ञान विभागाने सुचविलेले आहे परंतु सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सदरच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येउ नये.

९. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या एकुण डेटा पॉईंटपैकी २४ डेटा पॉईंट कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी डेटा रिकव्हरी सेंटर येथे कार्यान्वीत केले असल्याचे नमुद केले आहे, त्यास आयटी कमिटीने मान्यता दिली.

१०. काळानुरुप संस्थानचे कार्यरत असलेल्या नेटवर्कवरील कार्यप्रणाली बंद करुन सर्व विभागांना साईटेक नेटवर्कद्वारे एकत्रित जोडण्यात यावे.

११. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी संस्थानचे इतर तांत्रिक Vendor बरोबर समन्वय ठेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

१२. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यप्रणालींचा पुर्ण अभ्यास करुन भविष्यात आवश्यक असणाऱ्या सॉफ्टवेअर, हार्डवेअर व नेटवर्क चे अतिरिक्त बाबींबाबत अहवाल माहीती तंत्रज्ञान विभागास वेळेत सादर करावा. जेणेकरुन त्याची तातडीने दखल घेणे सोईचे होईल व श्री साईभक्तांना सेवा पुरवितांना अडचणी येणार नाहीत.

१३. प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व विभागांच्या कार्यप्रणालींची जुळणी करुन कामाचे Duplication टाळावे व प्रकल्पाचा हेतु साध्य करावा.

१४. प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात येणाऱ्या सर्व कार्यप्रणाली ३१/०३/२०१४ पर्यंत कार्यान्वीत कराव्यात तसेच कार्यप्रणाली वापरत येणाऱ्या सर्व अडचणी व त्रुटींचे निरसन दि. ३०/०४/२०१४ पुर्वी करावे.

**मा.व्यवस्थापन समितीने उपरोक्त चर्चेनतर माहीती तंत्रज्ञान विभाग व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रकल्पाबाबत असणाऱ्या अडचणी समजावून घेतल्या व त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्देश दिले आहेत -**

**१.** साईटेक प्रकल्पासंदर्भात संस्थानकडून कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना यापुर्वी देण्यात आलेल्या व यापुढे येणाऱ्या अडचणीं/त्रुटींचे निरसण विहीत वेळेत करावे.

**२.** कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कोणत्याही कार्यप्रणालीमधील बदल/त्रुटी संदर्भातील कामकाज पुर्ण झालेनंतर सदरचे काम अगोदर माहीती तंत्रज्ञान विभागास दाखवावेत व नंतरच संबधीत विभागात कार्यानवीत करावे.

**३.** कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींचे वैशिष्ट्ये संबधीतांना पटवुन देऊन कार्यप्रणाली वापरण्यास प्रोत्साहीत करावे.

**४.** सर्व कार्यप्रणाली या परिणामकारकरित्या कार्यान्वीत झालेनंतरच सदर कार्यप्रणालीचे फायदे संबधींताना कळून येतील, सबब कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी त्यादृष्टीने सर्व कार्यप्रणाली कार्यान्वीत करुन द्याव्यात.

**५.** ई-ऑफीस हि संकल्पना प्रत्यक्षात येईल, यादृष्टीने साईटेक प्रकल्पाची कार्यवाही प्रभावीतपणे करण्यात यावी.

**६.** कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या अडचणी तातडीने व विहित वेळेत सोडविणेसाठी प्रत्यक्ष काम करणाऱ्या स्टाफची शिर्डी येथे नेमणुक करण्यात यावी.

**७.** कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी शिर्डी येथे नेमलेल्या कर्मचाऱ्यामध्ये कामकाज करतांनी समन्वय राहिल या बाबत दक्षता घ्यावी.

**८.** संस्थान कर्मचाऱ्यांनी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे कर्मचाऱ्यांबरोबर योग्य पद्धतीने वागावे व त्यांना सदरकामी सहकार्य करावे या करीता सर्व विभागांना परिपत्रक काढावे.

**९.** कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे व माहीती तंत्रज्ञान विभाग यांनी सयुक्तपणे प्रत्येक विभागास भेट देऊन व संबधीताशी चर्चा करुन, भविष्यात लागणाऱ्या हार्डवेअर, सॉफ्टवेअर, नेटवर्क इत्यादी ची माहीती संकलीत करावी व त्याचा अहवाल अवलोकनार्थ आयटी कमिटीकडे पाठवावा.

**१०.** मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०८/०१/२०१४ राजीचे झालेल्या निर्णय क्रं. ४८ नुसार भरावयाची तांत्रिक पदे तुर्त भरु नयेत. साईटेक प्रकल्पाची कार्यवाही पुर्ण झालेनंतर यावर यथा-योग्य ती कार्यवाही विभागास आवश्यकता वाटल्यास करण्यात यावी.

**११.** साईटेक प्रकल्पाची व्याप्ती व दिवसें-दिवस माहिती तंत्रज्ञानातील होणारे बदल विचार घेता साईटेक प्रकल्प व्यवस्थापनाचे सर्व कामकाज, भविष्यात संस्थानचे विहित पध्दतीने Out Source करण्यात यावे, असे निर्देश देऊन त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**१२.** साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व कार्यप्रणालीं व Infrastructure संबधीचे आवश्यक प्रशिक्षण माहीती तंत्रज्ञान विभागातील कर्मचाऱ्यांना कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी द्यावे.

**१३.** साईटेक प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या करारनाम्यामध्ये भविष्यात आवश्यकतेनुसार बदल करावयाचे झाल्यास, त्यादृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**१४.** दिनांक ०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४६ नुसार, साईटेक प्रकल्पातील संगणकीय प्रणालीचे कामकाजाचे आणि मुल्यांकणाचे महाराष्ट्र शासनाचे माहीती तंत्रज्ञान संचनालय विभागामार्फत Third Party Audit करणे अत्यावशक आहे, परंतु याबाबतीत शासनास पत्रव्यवहार करणेपुर्वी मा.श्री.के.व्ही.रमणी सो., अध्यक्ष तांत्रिक सल्लागार समिती व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधींसमवेत चर्चा करण्यात यावी असे ठरले होते. सदरच्या बैठकीत या विषयावर सविस्तर चर्चेअंती महाराष्ट्र शासनाचे माहीती तंत्रज्ञान संचनालय विभागास सदरकामी पत्र देण्याचे निर्देश देण्यात ओलेले आहेत.

दिनांक १५/०३/२०१४ रोजी साईटेक प्रकल्पासंदर्भात आय टी कमीटी व व्यवस्थापन समितीचे संयुक्त बैठकीत झालेले विषय व निर्णयांची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.२८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पासंदर्भात आय. टी. कमिटी व व्यवस्थापन समिती यांच्या संयुक्त बैठकीच्या इतिवृत्ताचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **माहे एप्रिल- २०१४ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे **एप्रिल,२०१४**अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणाऱ्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणेः -

| अ.नं. तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| १) विजया बँक, शिर्डी | ५/४/२०१४ | २१,९१,५१,६७०/- |
| २) विजया बँक, शिर्डी | १३/४/२०१४ | २७,३९,३९,५८७/- |
| ३) कॅनरा बँक, शिर्डी | १८/४/२०१४ | ३६,०८,९३,९१८/- |
| ४) कॅनरा बँक, शिर्डी | २०/४/२०१४ | ७,६५,५३,२५४/- |
| ५) कॅनरा बँक, शिर्डी | २५/४/२०१४ | २६,२४,६८,३०४/- |
| ६) कॅनरा बँक, शिर्डी | २६/४/२०१४ | ९,८४,२५,६१४/- |
| ७) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | २६/४/२०१४ | ९,८४,२५,६१४/- |
| ७) दैनंदिन खर्च वजा जाता माहे एप्रिल- २०१४ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | एकूण रक्कम | १४८,९८,५७,९६१/- |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. १४८.९९ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणार आहेत. प्रचलित कार्यपद्धतीनुसार उपलब्ध होणारी रक्कम उच्चतम व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयीकृत बँकांकडे गुंतविण्यात येते. त्यास अनुसरून सदर बँका संस्थानला चांगल्या बँकिंग सेवा देतात. वैधानिक लेखापरिक्षणात लेखापरीक्षकांनी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणाऱ्या बँकेकडेच उच्चतम व्याजदराने गुंतविण्यात यावी असे सुचविले आहे. त्यास अनुसरून बँकिग सेवा व आर्थिक फायद्याच्या दृष्टीने गुंतवणूकीसाठी वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या रकमेची, खाली नमूद केलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवून जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे गुंतवणूक करता येईल.

१) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) देना बँक, शिर्डी
८) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
९) युको बँक, शिर्डी
१०) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
१२) विजया बँक, शिर्डी
१३) इंडीयन बँक, शिर्डी
१४) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१५) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १५ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. १४८.९९ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.२८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १५ या स्थानिक, राष्ट्रीयीकृत व संस्थानला सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१४८.९९ मात्र कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२३** **कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफींग (Geomembrance Fabrics) करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र मौजे कनकुरी ग्रामपंचायत हद्दीमध्ये आहे. साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र इ.ची कामे १९९२ साली पुर्ण करण्यात आलेली आहेत. सदरहु योजना ही मौजे कनकुरी, मौजे पिंपळवाडी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची संयुक्तीकरित्या तयार करण्यात आलेली आहेत. सदरहु योजनेव्दारे मंदिर परिसर, संस्थान भक्तनिवासस्थाने, स्टाफ क्वॉर्टर्स, श्री साईप्रसादालय, मौजे कनकुरी, मौजे पिंपळवाडी येथे शुध्दीकरण केलेल्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

**पाणी पुरवठा योजनेचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.नं. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| ०१ | पाणी पुरवठा योजना कधीपासून कार्यान्वित करणेत आली. | सन १९९२ |
| ०२ | महिन्याला इरिगेशन विभागाकडुन घेण्यात येणारे सरासरी पाणी. | १२,५९,१०,३३३ लिटर्स. |
| ०३ | साठवण तलावाची क्षमता. | ३३२ एम.एल. |
| ०४ | साठवण क्षमता किती दिवस पुरते. (सर्वसाधारण गर्दीचे काळात) | ४० ते ४५ दिवस. |
| ०५ | साठवण तलावात उन्हाळयात अथवा गर्दीच्या काळात किती दिवस पाणी पुरते. | ३० ते ३५ दिवस. |
| ०६ | २४ तासात अंदाजे किती दिवस पाणी पुरवठा करण्यात येतो. | ३८ ते ४० लाख लिटर्स. |

श्री साईबाबा संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे एकुण ०३ साठवण तलाव तयार करण्यात आलेले आहेत. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे-

**०१) साठवण त. क्र. ०१ :-** लांबी २७१ मिटर x रुंदी ११४ मिटर x ३ मिटर. (एकुण साठवण क्षमता ९० द.ल.लि.)

**०२) साठवण त. क्र. ०२ :-** लांबी २६५.६ मिटर x रुंदी ३१४ मिटर x ३ मिटर. (एकुण साठवण क्षमता २२७ द.ल.लि.)

**०३) साठवण त. क्र. ०३ :-** लांबी ८२ मिटर x रुंदी ६५ मिटर x ४.५ मिटर. (एकुण साठवण क्षमता १५ द.ल.लि.)

कनकुरी साठवण तलाव येथे संस्थानचे तीन साठवण तलाव आहेत. सदरहु तलावांची एकुण क्षमता ही ३३२ एम.एल. इतकी आहे. सर्वसाधारण गर्दीचे काळात व पावसाळा तसेच हिवाळयात सदरहु साठवण तालावातील पाणी हे साधारणतः ४० ते ४५ दिवस पुरते. गर्दीचे काळात, उत्सव कालावधीत व उन्हाळयामध्ये साठवण तलावातील पाणी हे ३० ते ३५ दिवस पुरते. संस्थान साठवण तलावाचे लगतचे स्थानिक शेतकऱ्यांचे विहीरी व बोअरवेलची संख्या मोठया प्रमाणात आहे. साठवण तलावाचे भराव्याचे दगडी पिचिंग खराब झाल्याने साठवण तलावातील पाण्याचे गळतीचे प्रमाणही मोठया प्रमाणात वाढलेले आहे.

दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१४ रोजी राहाता पाटबंधारे विभाग, राहाता येथे मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचे उपस्थितीत चालू रोटेशन व त्यापुढील उन्हाळयातील रोटेशनबाबत करावयाचे नियोजनासाठी मिटींग आयोजित केलेली होती. सदर मिटींगमध्ये त्यांनी चालू वर्षी व त्यापुढील कालावधीत धरणांतील पाणी काळजीपुर्वक वापरणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. तसेच नाशिक पाटबंधारे विभाग नाशिक यांचे जा.क्रं./सिं.९/१३३६/२०१४, दि.१५/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये त्यांनी साठवण तलावातील पाणी २ महिने पुरेल असे नियोजन तातडीने करणेबाबत कळविले आहे. तसेच साठवण तलावाची क्षमता वाढवून तलावातील पाणी गळती थांबविणेबाबत उपाय-योजना तातडीने करणेबाबत सांगितलेले आहे.

संस्थानसाठी वाढीव पाणी पुरवठा योजना तयार करणेचे कामांबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत कार्यवाही चालू आहे. तसेच सदर पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक, आराखडे इ. कामाबाबत शासन स्तरावर मान्यता मिळणेबाबतची कार्यवाही त्यांचेकडुन करण्यात येत आहे. सदर कामांसाठी अजुन

काही कालावधी जाईल. त्यापुर्वी संस्थानचे तीनही साठवण तलावास HDPE Geomembrance Fabrics Sheet टाकणे गरजेचे आहे.

संस्थानचे तीन साठवण तलावांपैकी साठवण तलाव क्रं.०१ करीता कॅन्व्हास प्रुफींग (Geomembrance Fabrics) करणेकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २४६ अन्वये उपरोक्त विषयांकित कामासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय पारीत झालेला आहे.

" .. .. यावर सविस्तर चर्चा होवून, कनकुरी येथील साठवण तलाव क्रं. ०१ (लांबी २७१ मिटर x रुंदी ११४ मिटर x ३ मिटर, एकुण साठवण क्षमता ९० एम.एल.) चे कॅन्व्हास प्रुफींग (HDPE Geomembrane Fabrics १००० Micron) करणेसाठी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले व याकामी येणाऱ्या जाहिरातीचे खर्चास मान्यता देण्यात आली."

उपरोक्त निर्णयात फक्त एकाच साठवण तलावामध्ये HDPE Geomembrance Fabrics १००० Micron टाकणेचे ठरलेले आहे. परंतू भविष्यातील वाढती पाण्याची गरज लक्षात घेता, संस्थानचे तीन साठवण तलावास HDPE Geomembrance Fabrics १००० Micron टाकणे गरजेचे आहे. तसेच सदरचे साठवण तलावांची खोली वाढविणे देखील गरजेचे आहे. सदरहू तीनही साठवण तलावांची टप्प्या-टप्प्याने खोली वाढवून HDPE Geomembrance Fabrics Sheet टाकणे तसेच त्यावर रफ शहाबाद फ्लोरींग फरशी) बसविणेचे कामांकरीता प्राथमिक ढोबळ अंदाजे रु.१०.५० कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम हे दोन टप्प्यात करावे लागणार असून पहिल्या टप्प्यात साठवण तलाव क्रं.०१ व ०३ चे काम करावे लागेल. उपरोक्त साठवण तलाव क्रं.०१ व ०३ चे HDPE Geomembrance Fabrics Sheet टाकणेचे काम पुर्ण होईपर्यंत या साठवण तलावात पाणी घेता येणार नाही. त्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून संस्थानचे सध्याचे साठवण तलावा शेजारील संस्थानचे गट नं. १२१ पैकीचे क्षेत्रात तात्पुरते १८० फुट x १८० फुट (अंदाजे ३० गुंठे) या मापाचे शेततळे तयार करुन पर्यायी पाणी साठवण्याची व्यवस्था करावी लागेल. याकरीता अंदाजे रु. १५ लाख मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चाचे रक्कम देणगी किंवा संस्थानमार्फत करावी लागेल.

उपरोक्त तीनही साठवण तलावास HDPE Geomembrance Fabrics Sheet टाकण्याचे काम करणेसाठी लागणाऱ्या खर्चाची रक्कम ही मोठया स्वरुपाची असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे सिव्हिल ॲप्लिकेशन नं.पी.आय.एल.नं.१८/२०११ मधील सिव्हिल ॲप्लिकेशन नं.१२०५६/२०१२ वर मे.कोर्टाने दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशातील कलम (६) अन्वये मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

तरी वरील तीनही साठवण तलावाचे HDPE Geomembrance Fabrics १००० Micron करणे व पाणी साठविणेसाठी पर्यायी शेततळे तयार करणेसाठी येणारे अंदाजे अपेक्षित रु.१०.६५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदरचे कामांसाठी प्रकल्प सल्लागार यांचे नेमणुकीसाठी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात देवून प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेस व या कामांसाठी परवानगी मिळणेकामी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल करणेस मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.२८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफींग (Geomembrance Fabrics) करणेकामीच्या प्रस्तावित कामांसाठी तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१०.६५ कोटी मात्रचे खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२४** **शिरडी ग्रामस्थांचे मागणीवरुन शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्युनिअर केजी वर्गासाठी वाढीव दोन तुकड्यांस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकडे वाढती विद्यार्थी संख्या व अपुऱ्या वर्ग/खोल्यामुळे सन २०१३-१४ पासून शाळा दोन सत्रात भरविण्यात येत आहे. वर्ग खोल्या अपु-या असल्याने ज्यु. केजीसाठी १२० प्रवेश अर्ज वाटप करण्यात आले परतू अजूनही अंदाजे १०० पालकांचे पाल्य के.जी प्रवेशापासून वंचीत आहेत.

दि. २०/०३/२०१४ रोजी पालकांनी शाळेच्या आवारात धरणे धरुन पाल्यांना प्रवेश मिळणेबाबत प्रशासनाकडे विनंती केलेली आहे. पालकांची विनंती मान्य करावयाची झाल्यास आय. टी . आय. विभागाकडील पाहाणी करण्यात आलेल्या दोन वर्गात मुले बसवून वाढीव दोन तुकडयां करता येतील मात्र आय. टी. आय. विभागाकडून त्या इंग्लिश मिडीयम विभागाकडे कायम स्वरुपी वर्ग कराव्या लागतील.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्य. केजीसाठी १२० प्रवेश देणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०७/०२/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९८अन्वये ३ तुकडयांची मान्यता घेण्यात आली होती. मागील वर्षीही पालकांनी अंदोलन करुन वर्ग तुकडयां वाढविणे बाबत आग्रह धरला व त्यावर विचार विनीमय होवून मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्र. ४१५ अन्वये ३ तुकडयांची वाढीव मान्यता घेण्यात आली. त्यावेळी एकूण २४५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता.

मा. त्रिसदस्य समिती दि. ०८.०१.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३८ अन्वये १२० प्रवेश अर्ज वाटप करण्यात आलेले असून शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये मागील वर्षाप्रमाणे कार्यवाही करुन २४५ इतके प्रवेश देण्यात यावेत अशी पालकांनी विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था., (आय. टी. आय.) विभागाकडील २ वर्ग खोल्या उपलब्ध झाल्या तर दोन वाढीव तुकडीस मान्यता देणेस हरकत नाही असे वाटते.

सदरचा विषय धोरणात्मक असल्याने यावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिरडी ग्रामस्थांचे मागणीवरुन शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्युनिअर केजी वर्गासाठी वाढीव दोन तुकड्यां करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, इंग्लिश मिडीयम स्कुलकडे वर्ग खोल्या अपुऱ्या पडत असल्यामुळे नवीन शैक्षणिक संकुलाचे बांधकाम पुर्ण होईपर्यंत श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडील २ वर्ग खोल्या इंग्लिश मिडीयम स्कुलच्या वापरास घेणेत याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.२५ शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता ज्युनिअर केजी वर्गाचा प्रवेशासाठी वर्गखोल्या कमी पडत असल्याने पालकांनी केलेल्या मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता ज्युनिअर केजी वर्गांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवितांना शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act,२००९ ) अन्वये अधीन राहून शासनाचे नियमीत वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रीया राबविण्याचे काम दि.०८/०३/२०१४ पासून सुरु करण्यात आले आहे. परंतू या दरम्यान एस.एस.सी परीक्षा आल्याने व आपल्या शाळेत एस.एस.सी. परीक्षेचे उपकेंद्र असल्याने प्रशासनाचे सोयीने दि. १४ मार्च २०१४ , दि. १८ मार्च ते दि.२० मार्च २०१४ अखेर, एकूण ४ दिवस प्रवेश अर्ज वाटप करण्यात आले असून प्रत्येक दिवशी ३० प्रवेश अर्ज वाटप करण्यात आलेले आहे, असे एकूण १२० प्रवेशअर्ज वाटप करण्यात आलेले आहे. यामध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रांची पडताळणी करुन पालकांना प्रवेश अर्ज वाटप करण्यात आलेले आहेत.

१. दि. ३१ मे २०१४ अखेर ज्या पाल्यांचे वय ३.३ ते ४.३ या वयोगटापर्यंत आहे , म्हणजे जन्मतारीख (फेब्रुवारी २०१० ते फेब्रुवारी २०११) या कालावधीतील आहे अशाच पालकांचे पाल्यांना प्रवेश अर्ज वाटप करण्यात आलेले आहे. ज्या पालकांचे पाल्याचे वय ३.३ ते ४.३ वयोगटात बसलेले नाहीत त्या पालकांना प्रवेश अर्ज देण्यात आलेले नाहीत.
२. ज्यु. के.जी. साठी प्रवेशअर्ज देतांना दुपारी ३ ते ५ यावेळेत रांगेतून आलेल्या सुरुवातीचे पालकांना फक्त शिरडी नगरपंचायत हद्दीतील व ३ कि.मी अंतराचे आत असलेले रहिवाशी असलेबाबतचा पुरावा पाहुन तसेच संस्थान कायम कर्मचारी पाल्य/ कंत्राटी कर्मचारी पाल्य पडताळणी करुन प्रवेश अर्ज देण्यात आले.

**<u>मागणी:-</u>** दि. २०/०३/२०१४ रोजी शिरडी गावातील ग्रामस्थांनी शाळेच्या पटागणांत इतर पालकांच्या समवेत बसून खालीलप्रमाणे मागण्या प्रशासनाने मान्य कराव्यात याकरीता धरणे धरुन उपोषणाचा इशारा दिला.

१. केजीसाठी प्रवेश देतांना वयोमर्यादा ४.३ ऐवजी ४.५ अशी करावी.
२. केजी साठी ३ तुकडयांऐवजी मागील वर्षाप्रमाणे ५ तुकडयांकरुन सर्व पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.
३. शाळेकरीता नवीन स्कुलबसेस खरेदी करण्यात याव्यात जेणेकरुन विद्यार्थ्यांचे जाण्या येण्याचे हाल होणार नाहीत.
४. मागील तीन वर्षाची परिस्थती लक्षात घेता शाळेचे मोठे शैक्षणिक संकुल बांधण्यात यावे व पर्यायी व्यवस्था म्हणून संस्थानचे साईआश्रमातील हॉल मध्ये वर्ग खोल्या भरविण्यात याव्यात.
५. शिरडी नजीकचे गावांतील पालकांचे पाल्यांना प्रवेश देण्यात यावा अशा मागण्या केल्या.

दि. २०/०३/२०१४ रोजी सायंकाळी ५ वाजता संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी सो. यांनी समक्ष श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे शैक्षणिक संकुलात हजर राहून पालकांच्या विविध मागण्या ऐकून घेतल्या. सदरचे प्रवेश प्रक्रीयेबाबत निर्णय मा. त्रिसदस्य समितीने घेतलेला असल्याने आपल्या मागण्यांबाबत मा. त्रिसदस्य समितीचे सदस्य यांचेशी चर्चा करुन पुढील कार्यवाही बाबत विचार करता येईल असे ग्रामस्थांना सांगीतले.

**विभागाचा अभिप्राय:-**

१) शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये अपु-या वर्ग खोल्या असल्याने मर्यादीत १२० प्रवेश देणे असल्याने ज्यु. केजीच्या फकत ३ तुकडया कार्यरत कराव्यात असे ठरलेले आहे. परंतू ज्यु. के.जी प्रवेशासाठी आलेल्या पालकांची संख्या लक्षात घेता प्रसंगी वर्ग तुकडींची संख्या वाढण्याची दाट शक्यता आहे. यावर उपाय म्हणून मा. उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे सूचनेनुसार संस्थानचे श्री साईबाबा औद्यगिक प्रशिक्षण संस्थेत मा. प्रशासकीय अधिकारी (शैक्षणिक संकुल), मा. प्राचार्या इं.मि.स्कुल व मा. प्राचार्य औद्यगिक प्रशिक्षण संस्था यांचे समवेत पाहाणी केली असता सदर इमारतीचे तळमाळयावर असलेली रुम नं. ०८ व दुस-या माळयावर असलेली रुम नं. २० ही सध्याचे परिस्थितीत मोकळी असल्याचे दिसून आले आहे. सदरचे ठिकाणी दोन वर्ग भरविता येईल असे मत आहे. परंतू लहान मुलांना ते जिकरीचे होईल.

२) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये सर्वात लहान वर्गांपासून प्रवेश प्रक्रीया असल्याने तसेच स्कुलबसेस व्यवस्था असल्याने पालकांचा प्रवेशाबाबत जास्त आग्रह असतो. ज्यु. केजी साठी प्रवेश घेतलेला विद्यार्थी इयत्ता १० वी पर्यंत येथे शिक्षण घेत असतो. सलग १२ वर्षे विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने आपुऱ्या वर्ग खोल्यांची उणीव भरुन काढणे अशक्य आहे असे मत आहे.

३) श्री साईबाबा औद्यगिक प्रशिक्षण संस्थेत इयत्ता १० वी चे पुढील शिक्षण असल्याने सर्व मोठे विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी किमान फक्त २ ते ३ वर्ष या ठिकाणी शिक्षण घेत असतात. तसेच याठिकाणी होस्टेल वगैरे सुविधा नसल्याने इतरत्र शिफ्ट करणेस अडचण येणार नाही. साईभक्तांचे वर्दळीत लहानमुले विद्यार्थी ठेवणे जोखमीचे होईल असे वाटते. तरी साईबाबा ज्युनियर कॉलेजकडे श्री साईबाबा औद्यगिक प्रशिक्षण संस्थचे संकुल शिप्ट केले तर इंग्लिश मिडीयम स्कुलचा वर्ग खोल्यांचा कायमचा प्रश्न सुटू शकेल असे वाटते.

४) श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर मध्ये इ. ५ वी ते इ. १० वी विद्यार्थीनी असल्याने एकुण फक्त १२ वर्ग चालविले जातात. ज्यु. कॉलेज व कन्या विद्या मंदीर हे पुर्वी एकत्र भरत होते. पुर्वी प्रमाणे कन्या विद्या मंदीर व ज्यु. कॉलेज एकत्र करुन कन्या शाळा ज्युनियर कॉलेजकडे शिफ्ट केल्यास इंग्लिश मिडीयम स्कुलसाठी १२ वर्ग उपलब्ध होवून शाळा एका सत्रात भरविता येईल तसेच स्कुलबसेस जादा होणाऱ्या फेऱ्या वाचविता येतील.

५) संस्थानचे वाहन विभागाशेजारील मोकळया जागेत पश्चिम बाजूस असलेल्या मोकळया जागेत के.जी वर्गासाठी १२ वर्ग १ कार्यालय व १ स्टाफरुम असे १४ वर्ग नवीन बांधण्यात यावेत जेणेकरुन हा प्रश्न कायमचा सुटू शकतो. यामुळे शाळा एका सत्रात सुरु ठेवता येईल. परंतू या विद्यार्थ्यांसाठी नवीन ४ बसेस खरेदी कराव्या लागतील.

**६) वयोगट मर्यादा ४.३ ऐवजी वाढवून ४.५ अशी करता येईल.**

७) शिरडी नगरपंचायत हद्दीचे बाहेरील पाल्यांना प्रवेश देण्यात येवू नये कारण प्रवेशाबाबत कुठलीही मर्यादा राहणार नाही असे वाटते.

८) शाळेकडे उपलब्ध असलेल्या इमारतीचे वरील बाजूस आणखी दोन मजले बांधून वर्ग खोल्या तयार करण्यात याव्यात असे मत आहे.

सदरचा विषय धोरणात्मक असल्याने याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील शिर्डी ग्रामस्थांचे मागणीनुसार ज्युनियर के.जी. प्रवेशासाठी वयोगट मर्यादा ४.३ ऐवजी वाढवून ४.५ करण्यात यावी. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्युनियर के.जी.च्या आणखी २ तुकडया वाढविणेत येऊन, मागील वर्षाप्रमाणे एकूण ५ तुकडया करण्यात याव्यात व ज्युनियर के.जी. प्रवेश नियमावलीनुसार २४५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.२६ श्री रामनवमी उत्सव- २०१४ मध्ये कुस्त्या व तमाशा तसेच टांगा शर्यती आयोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांनी शिरडीत सुरु केलेल्या रामनवमी उत्सवास प्रथापरंपरेप्रमाणे चालू वर्षी कुस्त्यांचा हंगामा मोठया प्रमाणात आयोजीत करावा असे शिर्डी नगरपंचायत व शिर्डी ग्रामस्थ यांच्या वतीने ठरले आहे.

यानुसार खालीलप्रमाणे कुस्त्यांचे नियोजन करण्यात आलेले आहे.

| | | | | विजेता | उपविजेता |
|---|---|---|---|---|---|
| | | | **साईकेसरी** | | |
| १ | चंद्रहार पाटील (महाराष्ट्र केसरी) | x | मनदिप सिंग | ५०,०००/- | ३०,०००/- |
| | | | **उपसाईकेसरी** | | |
| २ | मच्छिंद्र जपे (ठाणे महापौर व साई केसरी) | x | सोमनाथ थेटे (गणपत आंधहकर पठ्ठा कोल्हापूर) | ४०,०००/- | २०,०००/- |
| ३ | अमित गाडे (जिल्हा केसरी) | x | योगेश दरेकर ( जिल्हा केसरी, मालेगांव) | २०,०००/- | १५,०००/ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | विलास डोईफोडे (महाराष्ट्र चॅम्पीयन) | x | प्रताप गायकवाड (उत्तर महाराष्ट्र केसरी, अहमदनगर) | २०,०००/- | १५,०००/- |
| ५ | कमलेश सांगळे (महाराष्ट्र चॅम्पीअन, आ.संजय पवार पठ्ठा) | x | गणेश शेळके (कर्जत) | १५,०००/- | १०,०००/- |
| ६ | गोकुळ कानडे (जिल्हा केसरी, येवला) | x | अनिल ब्राम्हणे (कुमार केसरी, ब्राम्हणी) | १०,०००/- | १०,०००/- |
| ७ | विश्वंभर खैरे ( जंगली महाराज कुस्ती केंद्र ) | x | जितू सिंग (आर्टलरी सेंटर, देवळाली कॅम्प) | १०,०००/- | ७,०००/- |
| ८ | संदिप लांडे (जंगली महाराज कुस्ती केंद्र | x | विजय डुकळे (आर्टलरी सेंटर, देवळाली कॅम्प) | ७०००/- | ५०००/- |
| ९ | संभाजी भवर (ब्राम्हणी ) | x | शरद धात्रक (महाराष्ट्र पोलीस, नाशिक) | ५०००/- | ३०००/- |
| १० | मंगेश मुर्तडक (कोऱ्हाळे ) | x | पिंटू जाधव (राहुरी) | ५०००/- | ३०००/- |

| | |
|---|---|
| उपरोक्त कुस्त्यांकरीता एकुण मानधन | :- रु २,९०,०००/- |
| इतर कुस्त्यांकरीता | :- रु १,५०,०००/- |
| कुस्ती निवेदक मानधन | :- रु १५,०००/- |
| हलगी वादक मानधन | :- रु १०,०००/- |
| प्रचार प्रसिध्दी (डिजीटल बोर्ड, पत्रके, रिक्षा अनाऊसंमेट | :- रु २०,०००/- |
| पंच मानधन | :- रु ६,०००/- |
| वरीलप्रमाणे कुस्त्यांकरीता एकुण खर्च | :- रु ४,९१,०००/- |

याशिवाय यात्रा कालावधीमध्ये श्री समोर तमाशा कलाकारांची हजेरी होत असते. येत्या रामनवमी उत्सवात लोककलेला प्रोत्साहन देणेकरीता सदरचे तमाशे मोफत आयोजीत करण्यात येणार आहे. या तमाशा कलाकारांना मानधन म्हणून रु.२,००,०००/- लाख रुपये दयावे लागणार आहे. तसेच टांगा शर्यती आयोजीत करण्यात येणार आहे. सदर शर्यतीसाठी रु.२,००,०००/- दयावे लागणार आहे.

श्री रामनवमी उत्सव २०१४ करीता कुस्त्या, तमाशा व टांगा शर्यत आयोजनाकरीता शिर्डी ग्रामस्थांनी खर्च रु.८,९१,०००/- संस्थान मार्फत करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

तसेच आज दि.५/०४/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता लेर्डीबागेतील सभागृहात श्री.कैलासबापू कोते पाटील व इतर ग्रामस्थ यांची सभा झाली त्यात त्यांनी सांगितले की ही प्रथा पुर्वीपासूनच चालू आहे. आता ७ लाख कुस्त्या हगामासाठी मिळावे अशी विनंती केलेली आहे.

मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१५/२/२०१४ सभेतील चर्चेनुसार त्यांना कुस्त्या हगामाकरीता संस्थानतर्फे पहिलवान, निवेदक, हलकी वादक, पंच इ.मानधन तसेच प्रचार प्रसिध्दी या सर्व खर्चासह रक्कम रुपये ३ लाख मंजुर करण्यात आलेले आहेत. याशिवाय आता मागणी केल्यानुसार अजुन रक्कम रुपये ४ लाख (चार लाख) मंजूर करावे लागतील.

निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी-०५)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र. २८९ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडील पी.आय.एल. २७/ २०१२ मध्ये मेजर फायनान्शीयलकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांची पुर्वमान्यता घेण्यात यावी, असा आदेश झालेला आहे. परंतु त्यामध्ये मेजर फायनान्शीयल म्हणजे नेमकी किती रक्कम, याचा उल्लेख नाही.

त्रिसदस्य समितीमार्फत तात्पुरते धोरण म्हणून रु.१० लाख मात्र पर्यंतचे प्रस्तावास मान्यता देऊन संस्थानची कामे करुन घेतली जात आहेत. त्यापुढील रकमेचे खर्चाकरीताचे प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे पाठविले जातात. असे प्रस्तावास त्यांची मान्यता घ्यावी लागते व त्यानंतर कार्यवाही करावी लागते. या सर्व प्रक्रियेसाठी बराचसा कालावधी लागतो. याकरीता मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज दाखल करुन मेजर फायनान्शील म्हणजे नेमकी किती रक्कम ती मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडून निश्चित करुन घेण्यात यावी. (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

वरील निर्णय क्र. २६३ ते २८९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्री ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (अजय मोरे) | (अनिल कवडे) | (बी.यु.देबडवार) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | प्र.प्रमुख जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी